या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शुक्रवार ७ जून २०२४ | अंक१८० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# राजीनाम्यावर ठाम असलेले फडणवीस घेणार अमित शहांची भेट, गृहमंत्रीपद कुणाकडे ?

**गृहमंत्रीपद कोणाकडे ?**
अखेर आज ते नरेंद्र मोदी तसेच अमित शाह यांची भेट घेतील, राज्यातील पराभवाच्या कारणांची समीक्षाही केली जाईल. फडणवीस हे राजीनामा देण्यावर ठाम आहेत. मात्र त्यांनी राजीनामा दिला तर गृहमंत्रीपद कोणाकडे जाणार असा सवाल सध्या उपस्थित होत आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचं मन वळवण्यात या दोन्ही नेत्यांना यश मिळतंय का हे पाहणंही महत्वाचं ठरणार आहे. एकंदरच दिल्लीत राजकीय घडामोडींना वेग आला असून पुढे काय घडतंय याकडे सर्वांचंच लक्ष लागलं आहे



लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपच्या खालावलेल्या कामगिरीमुळे पक्षाला मोठा धक्का बसला आहे. 2019 साली भाजपाचे 23 खासदार होते. मात्र 2024 च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रा भाजपचे केवळ 9 खासदार निवडून आले. या पिछेहाटीमुळे पक्षातील नेत्यांना मोठा धक्का बसला. या पराभवाची जबाबदारी स्वीकारत भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यायची तयारी दर्शवली. भाजपच्या संसदीय पक्षाची आज बैठक असून त्यासाठीच देवेंद्र फडणवीस हे काल संध्याकाळी दिल्लीत दाखल झाले आहेत. आज ते अमित शाह यांची भेट घेणार असून राजीनाम्याची जी इच्छा त्यांनी व्यक्त केली त्यावर आज चर्चा होणार आहे.बुधवारी संध्याकाळी पत्रकार परिषदेदरम्यान फडणवीस यांनी पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारत आपल्याला सरकारमधून मोकळं करावं अशी विनंती केली होती. त्यानंतर काल अमित शहा यांनी फडणवीस यांना फोन करून त्यांच्याशी चर्चा केली. फडणवीस यांच्या मनात नेमकं काय आहे ते, त्यांच्या भावना शाह यांनी जाणून घेतल्या. सविस्तर माहिती जाणूनघेतली. आणि या मुद्यावर दिल्लीत आल्यावर, प्रत्यक्ष भेटीत चर्चा करू, असेही शाह यांनी फडणवीस यांना काल सांगितलं. निवडणुकीत भाजपला मोठा फटकालोकसभा निवणुकीत भाजपला उत्तर प्रदेश तसेच महाराष्ट्रात मोठा फटका बसला आहे. 2014 आणि 2019 मध्ये महाराष्ट्रात महायुतीचे 40 पेक्षा जास्त खासदार निवडून आले होते.

## असे करा पिकाचे नियोजन

**बीड प्रतिनिधी**

बीड, दि. 6 :सध्या जिल्ह्यात सर्व दूर पेरणीला लायक पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकरी वर्गाने पेरणीची घाई करू नये. साधारणतः 75 ते 100 मिलिमीटर पाऊस झाल व जमिनीत साधारणतः सहा इंच ओल झाली त्यानंतर पेरणी करावी.पेरणी करण्यापूर्वी घरच्या घरी बियाण्याची उगवण क्षमता तपासून घ्यावी. रासायनिक खतांचा अति वापरा अयोग्य वापर जामेनीच्या आरोग्यासाठी चांगला नसतो. तेव्हा रासायनिक खते वापर करण्यापूर्वी जमिनीत पुरेशा प्रमाणात सेंद्रिय खतांचा वापर करावा. रासायनिक खतांचा बेसल डोस ठरविताना माती परीक्षण अहवाल अथवा गावचा जमीन सुपिकता निर्देशांक याचा वापर करून तो डोस पेरणी वेळी द्यावा. रासायनिक खतांची बचत होण्यासाठी बियाणास जैविक खतांची वीज प्रक्रिया करावी. आपल्या गावचे कृषी सहाय्यक यांना संपर्क करून आपण बियाणे उगवण बीज प्रक्रिया आदींचे प्रत्याक्षिक देखील करू शकता, असे आवाहन जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी यांनी केले आहे.



## शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा

**नांदेड प्रतिनिधी**

नांदेड : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त सोमुर येथे शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत येथे शासनाने सांगितलेल्या नियमावली नुसार छत्रपती शिवाजी महाराज यांना सरपंच सरस्वती बालाजी सुर्यवंशी यांच्याहस्ते अभिवादन करुन एक पताका झेंडा फडकविण्यात आला त्याचबरोबर सामुहिक राज्यगीत व राष्ट्रगीत गायण्यात आले यावेळी सरपंच सरस्वती बालाजी सुर्यवंशी,आलीम शेख, पोलिस पाटील ज्योती पाटील,दिगंबर पाटील,मारोती रॅपनवाड, संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील,विठ्ठलरेड्डी निंगदाळे, बालाजी पाटील,विजय बिरादार,शिवाजी भाले,ईस्मालसाब शेख, मारोती बोंडगे,श्रीरंग डोंगळे,सुरज बिरादार,राणबा ठावरे,यशवंत सुर्यवंशी,फकीर शेख आदिंची उपस्थिती होती सोमुर येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या नियोजित जागेवर देखील छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करत शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला छत्रपती शिवाजी महाराज की जय शिवराज्याभिषेक दिनाचा विजय असो या जयघोषाने परिसर दणाणुन गेला होता यावेळी संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, संभाजी पाटील, पृथ्वीराज पाटील,इस्माईल शेख, बालाजी सुर्यवंशी, श्रीरंग डोंगळे,विष्णुकांत बिरादार,मारोती बिरादार,पवन कुडले, पोलिस पाटील ज्योती पाटील,दिलीप बिरादार,आजय बिरादार,हरीदास बिरादार,रामा परीट, श्रीनिवास निंगदाळे, जयपाल निंगदाळे,आकाश बिरादार, सतीश पाटील,शहाजी भाले,पंढरी कोकणे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



## श्याम उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची नीट परिक्षेत गगन भरारी...

**प्रतिनिधी/केज**

केज तालुक्यातील दहिफळ (वड ) येथील श्याम उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी २०२३/२४ मध्ये घेण्यात आलेल्या नीट (राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा) मध्ये पात्र ठरत घवघवीत यश संपादन करून एमबीबीएस साठी पात्र ठरत विद्यालयाची यशाची परंपरा कायम राखली आहे. त्यामध्ये चि.ठोंबरे कृष्णा राजेंद्र ६४८ गुण, चि.खराटे निखिल ६२६ गुण ,चि.महेश माने ५९६ गुण ,चि. शेटे तुषार ५९१ गुण,कु. वनवे सृष्टी ५८८ गुण तर ,चि.काळे पियुष ५६० गुण घेऊन नीट एमबीबीएस प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत.

या त्यांच्या यशाबद्दल श्याम उच्च माध्यमिक विद्यालय दहिफळ (वड.) सर्व एमबीबीएस पात्र विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव श्री शरद बप्पा गदळे, संस्थेचे अध्यक्ष डॉ.शशिकांत दहिफळकर व शाळेच्या प्राचार्या जयश्री ईप्पर तसेच प्रा.अध्यापनाचे अतिशय महत्त्वाचे कार्य पार पाडणारे सोळंके पी.एस.,गपाट एम.टी,. गायकवाड एम.जी.,राऊत टी. एम.,मुंडे बी. एम., भालेराव डी.ए., कुटे व्ही. व्ही., सिरसाट एम. एस., खेडकर एच. बीं.,मुंडे एस. पी.,खाडे ए. एस.,कदम मॅडम,मेहेत्रे मॅडम ,नागरगोजे आर. सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.




## वरोरा रुग्णालय येथे पोस्टर प्रदर्शनी



दिनांक ५जून २०२४ ला पर्यावरण दिनानिमित्त सौ वंदना विनोद बरडे अधीसेवीका व सामाजिक कार्यकर्त्या यांनी रुग्णांना पोस्टर मार्फत पर्यावरण दिनाचे महत्त्व समजावून सांगितले आणि घोषवाक्य बनवुन माहिती दिली.पर्यावरण वाचवण्यासाठी काय करायला पाहिजे.काय काळजी घ्यायची,, उपाययोजना काय करायची. याविषयी सवीस्तर माहीत दिली.झाडे लावा,झाडे जगवा, झाडांचे संवर्धन करा संरक्षण करा, पाण्याची बचत करा, पाणी जिरवा पाणी वाचवा.ईत्यादी माहीती दिली.कापडी पिशवीचा वापर करा.कचरा होणार नाही याची काळजी घ्या.कचर्याच नियोजन व्यवस्थित करा.घरगुती कचरा, वेस्टेड भाजीपालाच खत बनवा.तण्णसेठ खत वापरु नये.ईत्यादी माहीती दिली.आणि सर्वांनी हा संदेश जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करणे प्रचार व प्रसार करणे जरुरीचे आहे.तसेच गणपतीच्या मूर्ती जवळ पोस्टर प्रदर्शनी पण लावून जनजागृती केली.

## खते, बियाणे,औषधी संबंधित काही अडचणी आल्यास संपर्क साधण्याचे आवाहन

बीड, दि. 6 :- सध्या खरीप 2024 हंगाम सुरू झालेला आहे. या हंगामात शेतकरी मोठ्या प्रमाणात बियाणे खते व नंतर औषधे खरेदी करत असतात त्यांना उत्तम दर्जाचे खते बियाणे व औषध उपलब्ध व्हावे, योग्यरीत्या किमतीत उपलब्ध व्हावे या उद्देशाने राज्यात गुणवत्ता नियंत्रण विभाग कार्यरत आहे. या विभागाची कार्य कक्षा तालुकास्तरावर पंचायत समितीचे कृषी अधिकारी तथा निरीक्षक व तालुका कृषी अधिकारी तथा निरीक्षक यांच्यापर्यंत आहे

खरीप हंगामात या दोन्ही कार्यालयात तसेच जिल्हास्तरावर जिल्हा परिषद व जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी कार्यालय येथे नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. यांची वेळ सकाळी 9.30 ते सायंकाळी 7.30 पर्यंत अशी आहे. याशिवाय तालुका स्तरावर तालुका कृषी अधिकारी व कृषी अधिकारी पंचायत समिती यांची भरारी पथके कार्यरत आहे.

जिल्हास्तरावर कृषी विकास अधिकारी व जिल्हा गुणवत्ता निरिक्षक यांचे भरारी पथक कार्यरत आहे. याशिवाय राज्यस्तरावरील कक्षाचे व टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत तसेच कृषी उपसंचालक, उपविभागाची कृषी अधिकारी व उपविभागीय कृषी अधिकारी यांचे तंत्र अधिकारी यांनाही निरीक्षकाचा दर्जा बहाल करण्यात आलेला आहे.



खते बियाणे व औषधी संबंधित काही अडचणी असल्यास शेतकरी त्यांच्या स्थानिक कार्यक्षेत्रातील तालुका अथवा पंचायत समिती कक्षाकडे अथवा भरारी पथकाकडे करू शकतात या विविध स्तरावरील पक्षांचे तसेच भरारी पथकांचे दूरध्वनी क्रमांक शेतकरी वर्गासाठी खुले करण्यात आलेले आहेत. त्यांची यादी सोबत जोडली आहे.

विशिष्ट कंपनी अथवा ग्रेड अथवा वाणाचा कोणीही आग्रही ठेवू नये. बाजारात बियाण्यांची असंख्य प्रकार उपलब्ध आहेत त्यानुसार पर्याय ठेवावा. विशिष्ट ग्रेडचे खत उपलब्ध नसल्यास कृषी सहाय्यक यांचे मार्गदर्शन घेऊन शेतकरीस्तरावर विविध खते सरळ खतांपासून तयार करणे शक्य आहे. तेव्हा पुनश्च आवाहन कोणत्याही विशिष्ट बियाण्याचे वाण उत्पादक अथवा खतांचे विशिष्ट कंपनीचे विशिष्ट ग्रेड यांचा आग्रह ठेवू नये. अशी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

कविता

## वृक्षदेव

चला लावू पुष्कळ
वड कडुनिंब पिंपळ
धरतीवरचे हे त्रिदेव देती
जगी शुद्ध हवेचा दरवळ

जीवघेणं प्रदुषण घालवाया
हाच एकमेव आहे मार्ग
हे तीन वृक्षदेवच आणू शकतात
पुन्हा धरेवर हिरवागार स्वर्ग

आपल्या मातीतली ही झाडं
लावू चला भारतभर
पळून जाईल उकाडा
येईल रिमझिम पावसाची सर

लावता वड कडुनिंब पिंपळ
हवेत येईल गारवा छान
पक्ष्यांच्या किलबिलाटाने
आनंदेल रान,हरपेल भान

मुंबई ठाण्यानेही गाठलं
यंदा तापमान चाळीस
दिल्लीने तर ओलांडली पन्नाशी
सर्वच प्राणीमात्रांचा जीव झाला
कासावीस

धरणं तलाव विहिरींनी
गाठला अखेरचा तळ
तळमळीने लावू सर्वत्र
वड कडुनिंब पिंपळ
जगाचा पोशिंदा तो अन्नदाता
असेल जर सुखी
तर जगात शहरात गावात
कोणीच नसेल मग दुःखी

राजेंद्र वाणी
दहिसर मुंबई ?
जय जिजाऊ- जय शिवराय !

# (आंतरराष्ट्रीय अन्न सुरक्षा दिन.)

अन्न साखळीच्या प्रत्येक टप्प्यावर अन्न सुरक्षित राहते याची खातरजमा करण्यात अन्न सुरक्षेची महत्त्वाची भूमिका आहे. उत्पादन ते कापणी, प्रक्रिया, साठवणूक, वितरण, तयारी आणि वापरापर्यंत सुरक्षा आवश्यक असते. दररोज सरासरी १६ लक्ष लोक असुरक्षित अन्न सेवन करतात. अन्न जिवाणू, विषाणू, परजीवी किंवा रासायनिक पदार्थांनी दूषित झाल्यामुळे ते आजारी पडतात. त्याचा परिणाम सर्व देशांवर होतो. जगभरातील दहापैकी एक व्यक्ती दरवर्षी दूषित अन्नामुळे आजारी पडतो. अन्नजन्य रोगांमुळे सार्वजनिक आरोग्यावरील भाराची तीव्रता मलेरिया किंवा एचआयव्ही एड्सच्या तुलनेत आहे. जिवाणू, विषाणू, परजीवी किंवा जड धातूंसारख्या रासायनिक पदार्थांनी दूषित अन्न खाल्ल्याने दोनशेहून अधिक रोग होतात. अन्नजन्य रोगाचे ४० टक्के ओझे ५ वर्षांखालील मुलांकडून वाहून जातो. प्रतिजैविक प्रतिरोधक सूक्ष्मजंतू अन्नसाखळीद्वारे, प्राणी आणि मानव यांच्यातील थेट संपर्काद्वारे किंवा वातावरणाद्वारे प्रसारित केले जाऊ शकतात. प्रतिवर्षी प्रतिजैविक प्रतिरोधक संसर्गामुळे जगभरात अंदाजे ७ लाख लोक मरतात. ५ वर्षांखालील मुलांना अन्नजन्य रोगाचा ४० टक्के भार सहन करावा लागतो, दरवर्षी एक लाख पंचवीस हजार मृत्यू होतात. अन्नजन्य परजीवी रोगांमुळे तीव्र आणि जुनाट आरोग्य समस्या उद्भवू शकतात. ११ मुख्य परजीवी रोगांपासून होणाऱ्या आजारांची अंदाजे संख्या दरवर्षी ४८.४ दशलक्ष आहे, त्यापैकी ४८ टक्के अन्नाद्वारे पसरतात. पाच वर्षांखालील मुलांना असुरक्षित अन्नामुळे कुपोषण आणि मृत्यू होण्याचा धोका जास्त असतो आणि अन्नजन्य आजाराचा ४० टक्के भार त्यांच्यावर असतो. या वयोगटातील अतिसारामुळे सहापैकी एकाचा मृत्यू असुरक्षित अन्नामुळे होतो. सुरक्षित आणि पौष्टिक आहारामुळे मुलांच्या वाढीस आणि विकासासाठी बौद्धिक आणि शारीरिक क्षमता सुधारून, तसेच प्रौढ जीवनात शालेय कामगिरी आणि कार्य उत्पादकता वाढून फायदा होतो. कोणतेही विरोधाभास नसल्यास, जीवनाच्या पहिल्या सहा महिन्यांत बाळाला खायला देण्याचा सर्वात सुरक्षित मार्ग म्हणजे अनन्य स्तनपानअन्न सुरक्षेसाठी संघ करा - सुरक्षित अन्न आणि चांगल्या आरोग्यासाठी एकत्र काम करूया! आपण खातो तेव्हा आमचे अन्न सुरक्षित आहे हे आम्हाला कसे कळते? आम्ही कदाचित आमचे हात धुतले असतील, आमची स्वयंपाकघरातील भांडी स्वच्छ केली असतील आणि आमचे अन्न योग्य तापमानात शिजवले असेल, सर्व चांगल्या अन्न सुरक्षा पद्धती. उत्पादनात कोणते घटक आहेत किंवा ते कसे शिजवायचे हे पाहण्यासाठी आम्ही कदाचित फूड पॅकेजिंग लेबले वाचली असतील आणि कदाचित हे लक्षात न घेता, आम्ही आमच्या अन्नाची योग्य प्रकारे वाढ, प्रक्रिया, पॅकेजिंग, वितरण आणि तयार करण्यात गुंतलेल्या प्रत्येकावर विश्वास ठेवला आहे, जेणेकरून आम्ही आजारी न पडता त्याचा आनंद घेऊ शकतो. आमचे अन्न सुरक्षित होते आणि आमचा विश्वास सार्थ ठरला कारण आमचे अन्न बनवण्यात गुंतलेले लोक - मग ते आमच्या घराजवळ असोत किंवा जगाच्या दुसऱ्या बाजूला. त्यांनी स्थापित अन्न सुरक्षा पद्धतींचे पालन केले, जे मानकांच्या स्वरूपात पारदर्शकपणे उपलब्ध आहेत. दुसऱ्या शब्दांत, अन्न मानके आपल्या सर्वांसाठी विश्वासाचा आधार बनवतात. अन्न मानके ही सुरक्षा आणि गुणवत्ता सुनिश्चित करण्याचा एक मार्ग आहे. ते शेतकरी आणि प्रोसेसरसाठी स्वच्छ अन्न हाताळण्याबाबत मार्गदर्शन करतात. ते ॲडिटीव्ह, दूषित पदार्थ, कीटकनाशकांचे अवशेष आणि पशुवैद्यकीय औषधांची कमाल पातळी परिभाषित करतात, जे सर्वजण सुरक्षितपणे सेवन करू शकतात. शिवाय अन्न सुरक्षित ठेवण्यासाठी त्याचे मोजमाप, पॅकेज आणि वाहतूक कशी करावी हे मानके निर्दिष्ट करतात. पोषण आणि ॲलर्जीन लेबलिंग सारख्या गोष्टींवर मानक लागू केल्याबद्दल धन्यवाद, ग्राहकांना हे समजू शकते की त्यांच्यासाठी अन्न चांगले आहे की नाही. बहुतेक सरकारे आणि संस्था जैविक, रासायनिक आणि भौतिक स्वरूपाचे धोके कव्हर करणारे वैज्ञानिक जोखीम मूल्यांकनांवर आधारित अन्न मानकांचा अवलंब करतात आणि त्यांची अंमलबजावणी करतात. मानके वैयक्तिक सरकारे किंवा संस्थांद्वारे किंवा प्रादेशिक किंवा आंतर-सरकारी मानक-सेटिंग संस्थांद्वारे विकसित केली जाऊ शकतात. अशीच एक आंतरराष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता मानक-निर्धारण संस्था म्हणजे कोडेक्स एलिमेंटेरियस कमिशन किंवा थोडक्यात कोडेक्स. कोडेक्स हे ठिकाण आहे, जिथे १८८ सदस्य देश आणि १ सदस्य संघटना-युरोपियन युनियन यांचे प्रतिनिधी अन्न सुरक्षित असल्याची खात्री करण्यासाठी एकत्र काम करतात.

कोडेक्स ग्राहकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि अन्न व्यापारातील न्याय्य पद्धती सुनिश्चित करण्याच्या आदेशासह कार्य करते. तांत्रिक समित्या पारदर्शक आणि सर्वसमावेशक पद्धतीने मानके, मार्गदर्शक तत्त्वे आणि सराव संहिता यांच्यासाठी मजकूर विकसित करण्यासाठी कार्य करतात. एफएओ आणि डब्ल्यूएचओच्या नेतृत्वाखालील जागतिक तज्ञ गटांच्या वैज्ञानिक सल्ल्यानुसार, मजकूर उद्योग आणि ग्राहक संघटनांसह २४३ निरीक्षक संस्थांच्या इनपुटसह विकसित केले आहेत. सरकार आणि अन्न उद्योगाद्वारे वापरलेले, कोडेक्स मानके राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याचे मार्गदर्शन करतात आणि सर्वोत्तम पद्धती सुनिश्चित करतात. जागतिक व्यापार संघटना बेंचमार्क म्हणून कोडेक्स मानके देखील वापरते. जर तुमचे अन्न परदेशातून येत असेल तर ते या मानकांची पूर्तता करणे आवश्यक आहे. कोडेक्स मानके अन्न सुरक्षेच्या केंद्रस्थानी असतात. त्यांना सहा दशके झाली आहेत. प्रत्येक वर्षी फूड कोड वाढतो- नवीन मानके सादर केली जातात आणि नवीन डेटा उपलब्ध झाल्यावर विद्यमान मानके अद्यतनित केली जातात. सन २०२३मध्ये कोडेक्स ६० वर्षांचे झाल्यावर, आम्ही सर्वत्र सर्वांसाठी सुरक्षित अन्नाचा मार्ग परिभाषित करण्यासाठी अन्न मानके साजरी करतो.

अन्न सुरक्षा आणि शाश्वत विकास उद्दिष्टे- अनेक शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अन्न सुरक्षा ही गुरुकिल्ली आहे आणि जागतिक अन्न सुरक्षा दिवस अन्नजन्य जोखीम टाळण्यासाठी, शोधण्यात आणि व्यवस्थापित करण्यात मदत करण्यासाठी ते चर्चेत आणते. सुरक्षित अन्न आर्थिक समृद्धी, शेतीला चालना, बाजारपेठ, पर्यटन आणि शाश्वत विकासासाठी योगदान देते. अन्न सुरक्षेशिवाय अन्न सुरक्षा नाही. उपासमार संपवणे म्हणजे सर्व लोकांना वर्षभर सुरक्षित, पौष्टिक आणि पुरेसे अन्न मिळणे. अन्न सुरक्षेचा लोकांच्या आरोग्यावर आणि पोषण आहारावर थेट परिणाम होतो. अन्नजन्य रोग टाळता येतात. जेव्हा देश अन्न साखळीत सुरक्षित आणि अपेक्षित गुणवत्तेचे असल्याची खात्री करण्यासाठी त्यांची नियामक, वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षमता मजबूत करतात, तेव्हा ते अन्न उत्पादन आणि उपभोगाच्या अधिक शाश्वत नमुन्यांकडे जातात. सध्या १.६ ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त वार्षिक अन्न निर्यात असलेले जागतिकीकृत जग आणि जटिल अन्न प्रणाली अन्न सुरक्षित असल्याची खात्री करण्यासाठी सर्व क्षेत्रांमध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्याची मागणी करते. अन्न सुरक्षा ही सरकार, अन्न उद्योग, उत्पादक आणि ग्राहक यांच्यात सामायिक जबाबदारी आहे.

!! सप्ताहभर आंतरराष्ट्रीय अन्न सुरक्षा दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**संकलन व सुलेखन श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी. रामनगर वॉर्ड, गडचिरोली. फक्त दूरभाष-7775041086.**

# बजरंग सोनवणे यांच्या विजयाचा आनंद साजरा



**माळेगाव प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे विजयी झाल्यानंतर केज तालुक्यातील माळेगाव सह इतर गावात गुलाल उधळून तोफा वाजवून विजयाचा आनंद साजरा करण्यात आला. महाविकास आघाडीचे बजरंग सोनवणे व महायुतीच्या पंकजा मुंडे यांच्यात अतिशय अटातटीची लढत झाली. चार जून रोजी झालेल्या मतमोजणीमध्ये प्रत्येक फेरीत चुरस पाहायला मिळाली. कधी मुंडे आघाडीवर राहायच्या तर कधी सोनवणे प्रत्येक फेरीत मताधिक्य कमी जास्त होत होते. त्यामुळे विजयाची उत्सुकता शिगेला पोहोचत होती. धाकधूक वाढत होती आणि निकाल काय लागेल याची शेवटपर्यंत खात्री कोणालाच नव्हती. मात्र अंतिम फेरीत बजरंग सोनवणे यांनी बाजी मारत ६५८५ मतांनी पंकजा मुंडेंचा पराभव करत विजयश्री खेचून आणत धक्कादायक विजय मिळवला. बजरंग सोनवणे यांच्या विजयाची अधिकृत घोषणा होताच रात्री उशिरापर्यंत आणि दुसऱ्यादिवशी सकाळी माळेगाव,गोटेगाव, मोटेगाव,सुकळी, सुर्डी-सोनेसांगवी, मांगवडगाव, सातेफळ येथे सोनवणे यांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून फटाक्याची आतषबाजी करत विजयाचा जल्लोष साजरा केला.

## १३ हजार कोटींचा नदीजोड सुधारित प्रस्ताव
## खासदारानंतर आता सिन्नर आमदाराकडून होतोय पाठपुरावा

**नाशिक/प्रतिनिधी**

सिन्नर विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी भागाला नदीजोड प्रकल्पाद्वारे पाणी मिळवून देण्यासाठी सुधारित १३ हजार २५० कोटींचा प्रस्ताव नाशिकच्या पश्चिम वाहिनी नद्यातून नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक समितीला सादर करण्यात आला आहे .समितीची शिफारस होऊन शासनाकडे प्रस्ताव पाठविला जाईल. आचारसंहिता नंतर त्याला मंजुरी मिळण्याची शक्यता आहे हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण दुष्काळी सिन्नर तालुक्याचे भाग्य उजळणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीकडून त्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. मात्र हा प्रकल्प सर्व समावेशक असावा अशी मागणी करीत, सिन्नरचे आमदार माणिकराव कोकाटे यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यात काही सुधारणा असल्यास ते सुचवत पुन्हा एकदा प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे सादर केला आहे. नाशिकच्या पश्चिम पट्ट्यातील समुद्रात वाहून जाणारे पाणी दमणगंगा व वैतरणा खोऱ्यातील पाणी वैतरणा धरणात सोडण्यात येणार आहे. तेथून ते कळवा धरणाद्वारे दारणा व बोरखिंड धरणात सोडण्यात येणार आहे. बोरखिंड धरणातून देव नदीत आणि देव नदीतून पूर कालवे व अन्य मार्गातून तालुक्यातील विविध भागात सोडले जाणार आहे. तालुक्याच्या शेतीला व घरगुती वापरासाठी हे पाणी सोडले जाणार असून त्यातून शिल्लक पाणी दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडोर साठी मिळणार आहे. सिन्नरच्या दुष्काळी पट्ट्यातील गोंदे व सुळेवाडी या दोन गावचा परिसर सर्वाधिक उंचावर आहे. सोनंबे मार्गे शरद वाढीच्या पुढे देशपांडे तेथील ढग्या डोंगराच्या आत बोगदा करून हे पाणी सुळेवाडी येथे जाईल. तेथून पूर्ण भागातील वितरण व्यवस्था करण्यात आली आहे. या परिसरातील देशवंडी नायगाव, जायगाव ,पाटपिंपरी, बारागाव पिंपरी, निमगाव, सिन्नर, हिवरगाव, कोमलवाडी, वडांगळी, व गुळवंच मार्गे खोपडी, देवपूर मार्गे पाण्याची वितरण व्यवस्था करण्याचे नियोजन आहे. गोंदे होऊन शेवटच्या वारेगाव - सायाळे या गावापर्यंत हे पाणी जाणार आहे. देशवंडी येथून सोडण्यात येणारे पाणी कळवा कालव्यात सोडण्यात येणार आहे. उन्हाळ्यातही कळवाला आवर्तन येईल, त्यामुळे कळव्याचे तीन ते चार आवर्तने होतील.

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल मध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा



**परळी(प्रतिनिधी)** : दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल परळी वैजनाथ येथील विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा केला, यंदाही शाळेच्या परिसरात अनेक वृक्षांची लागवड केली. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवडी बरोबरच आकर्षक प्रार्थना सादर करत जागतिक पर्यावरण दिनाचे महत्त्व पटवून दिले. सदर प्रसंगी प्रशालेच्या प्राचार्य श्री. श्रीकांत पाटील तसेच शिक्षकांनी देखील वृक्षारोपणात सहभाग घेत सर्वांनी वृक्षरोपणाची गरज व त्याचे फायदे व वृक्षसंवर्धन कसे करावे या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

सदर प्रसंगी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक विवेकानंद युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.ऊषा किरण गित्ते तसेच प्रशालेचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक मा. श्री. किरण गित्ते साहेब (सचिव नगरविकास सार्वजनिक बांधकाम उद्योग पर्यटन विभाग त्रिपुरा सरकार) त्याचबरोबर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.श्रीकांत पाटील यांनी केले.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने जिजाऊ ब्रिगेड बीड जिल्हा महीला पदाधिकारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

# लोकांनी खाल्लं त्यांचं मटण अनब दाबलं आमचं बटण; गुलाबराव पाटील यांची चौफेर टोलेबाजी

जळगावमध्ये भाजपाच्या दोन लोकसभा जागा आल्या आहेत. एक जळगावात स्मिता वाघ आणि रावेरमधून रक्षा खडसे विजयी झाल्या आहेत. याचा विजय महोत्सव साजरा करण्यात आला. मंत्री गुलाबराव पाटील यांनी विजयाबद्दल जनतेचे आभार मानत जळगाव जिल्हा शिवसेना भाजपचा बालेकिल्ला होता बाले किल्ला आहे आणि बालेकिल्ला राहणार हे आपण या ठिकाणी दाखवल्याचे गुलाबराव पाटील यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांच्या नऊ जागा कशामुळे आल्या. त्यांना मुस्लिमांची मते मिळाली. दलितांना सांगितले की घटना बदणार आहे असं सांगून त्यांनी मते मिळविली. मुस्लिम आणि दलित सरकले तर मग तुमचे काय होईल ?..तेरा क्या होगा..संजय राऊत, तू काय बोलतो, त्याला तर सांगितल होतं..माझ्या मतदार संघात लढ..मग बघ कसा भगवा फडकवतो आणि तुला आडवा पडतो अशा शद्बात मंत्री गुलाबराव पाटील यांनी संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. यंदा महिलांनी सर्वाधिक मते दिली आहेत. आपल्याकडे 100 टक्के महिला आहेत. दोन्ही महिला खासदार, चार महिन्यानंतर आपली



निवडणूक. होऊन होऊन किती कमी होतील ? लोकांनी खाल्लं त्यांचं मटण आणि दाबल आपल बटण....अशा शब्दात गुलाबराव पाटील यांनी भाषण करताच उपस्थितात एकच खसखस पिकली. देशात आणि राज्यात म्हणे आमची वाईट स्थिती आमची झाली आहे. आता मला सांगा..240 खासदार भाजपाचे आहेत..250 पक्के..त्यांच्याकडे एकाच पक्षाचे एवढे खासदार आहेत का ?..आणि जर त्यांचं झालच सरकार तर..मुंडकं काँग्रेसचं , कंबर चंद्राबाबूची आणि बोटं शरद पवार यांची अस कसं चालेल सरकार ? असेही ते म्हणाले.

गद्दार हा विषय आता संपला आहे. लोकांना उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे काय माहीत ..त्यांना मीच माहित आहे..तुमच्यासाठी एकनाथ शिंदे पण मीच आणि मंत्री गुलाबराव पाटील सुद्धा मीच आहे. आमच्या काळात जेवढे बौद्ध विहार झाले ते काँग्रेसच्या काळात नाही झाले. त्यांनी मुस्लिमांना भीती दाखवली. दलितांना भीती दाखविली. काँग्रेसने घटना 80 वेळा बदलली आहे. आम्हाला म्हटलं.. तुमचे काय होईल, तर आजपर्यंत जी सेवा केली तशीच सेवा करणार. स्मिता वाघ यांनी दिल्लीत जळगावचा आवाज घुमवा अशी विनंती करतो असेही मंत्री गुलाबराव पाटील यावेळी भाषणात म्हटले.

## सोयगाव तालुक्यात वीज कोसळून वानरा सह बैलाचा मृत्य-

**प्रतिनिधी/सोयगाव**

सोयगाव सह तालुक्यात बुधवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास झालेल्या विजांच्या कडकडाटात वाकडी शिवारातील गट क्र -९५ मधील झाडावर कोसळलेल्या विजे मुळे झाडावरील झोपलेल्या वानरा सह झाडाखाली दावणीला बांधलेल्या बैलाचा रात्री नऊ वाजता मृत्यू झाला याप्रकरणी गुरुवारी महसूल च्या तलाठी अमित गंगावणे यांनी घटनेचा पंचनामा केला आहे



सोयगाव तालुक्यात बुधवरी रात्री अचानक विजांच्या कडकडाट मध्ये पाऊस सुरू झाला दरम्यान बुधवरी रात्री नऊ वाजता वाकडी शिवारातील गट क्र-९५ मध्ये झाडाखाली भाउदास ओंकार करणकाळ यांच्या शेतात त्यांचा बैल दावणीला बांधलेला होता दरम्यान झाडावर वीज कोसळून झाडावर झोपलेल्या वानरा सह बैल जागीच ठार झाला आहे तलाठी अमित गंगावणे यांनी घ ट ना स्थ ळी पंचनामा केला आहे या घटनेत शेतकरी भाउदास करणकाळ यांचे ६५ हजार रु चे नुकसान झाले आहे तहसीलदार मनीषा मेने यांनी गुरुवारी अहवाल पाठविला आहे.....

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत बाबींची पूर्तता करण्यासाठी गावपातळीवर विशेष मोहिम

**बीड प्रतिनिधी**

बीड, दि. 6 : शेतक-यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची 18 वर्षाखालील अपत्ये) रु. 2000/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. 6000/- लाभ अदा करण्यात आला आहे.

लागवडीलायक क्षेत्रधारक, बँक खाती आधार संलग्न व योजनेचे eKYC केलेले शेतकरी कुटुंब पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. या योजनेच्या लाभासाठी बंधनकारक असलेल्या या तिन्ही बाबींची पूर्तता राज्यातील 90.20 लाख लाभार्थ्यांनी केलेली आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक 05 जून, 2024 ते 15 जून, 2024 या कालावधीत या बंधनकारक बाबींची उर्वरित लाभार्थींनी पूर्तता करण्यासाठी गावपातळीवर विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेमध्ये लाभार्थींची स्वयं नोंदणी व e-KYC साठी राज्यातील सर्व सामाईक सुविधा केंद्र (CSC) तर आधार संलग्न बँक खाती उघडण्यासाठी इंडिया पोस्ट पेमेंट बँक यांनाही सहभागी करण्यात आले आहे. त्यानुसार भूमी अभिलेख नोंदीनुसार (RoR नुसार) जमिनीचा तपशील अद्ययावत न केलेल्या, बँक खाती आधार संलग्न व ई-केवायसी न केलेल्या लाभार्थींनी सदर बाबींची पूर्तता या विशेष मोहिमेमध्ये करून घ्यावी.

यामध्ये भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत नसलेल्या (Land Seeding - No) लाभार्थींनी संबंधित तलाठी / तहसील कार्यालयामध्ये संपर्क साधावा. त्याचप्रमाणे eKYC व बँक खाती आधार संलग्न करणे यासाठी अनुक्रमे नजीकच्या सामाईक सुविधा केंद्र (CSC) व इंडिया पोस्ट पेमेंट बँक (IPPB) च्या मार्फत कार्यपूर्तता करावी.पी.एम. किसान योजनेचा 17 वा हप्त्याचा लाभ जून महिन्याच्या शेवटच्या किंवा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वितरीत करण्याचे केंद्र शासनाचे नियोजन आहे. या योजनेसाठी नोंदणी करणे, ई-केवायसी करणे, बँक खाती आधार क्रमांकास जोडणे या बाबींची पूर्तता योजनेचा 17 वा हप्ता वितरणापूर्वी राज्यातील सर्व शेतक-यांनी स्वत: करून घेण्याचे आवाहन कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुण्याचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) विकास पाटील यांनी केले.

# शंकी गोगलगाय नियंत्रणासाठी उपयोजना

**बीड प्रतिनिधी**

बीड, दि. 6 : जिल्ह्यात मागील तीन वर्षापासून सोयाबीन कापूस भाजीपाला आदी पिकांवर शंकी गोगलगायीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सोयाबीन पिकांमध्ये रोप अवस्थेतच गोगलगायींचा प्रादुर्भाव होत असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. या गोगलगायींना वेळीच ओळखून खालील प्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे जेणेकरून पुढील नुकसान टाळता येईल.

शंखी गोगलगाय किडीची ओळख:- शंकीच्या पाठीवर एक ते दीड इंच लांबीचे गोलाकार कवच असते. बहुतांशी शंकी गर्द, करड्या, फिकट किंवा हिरव्या काळपट रंगाच्या असतात. ही कीड रात्रीच्या वेळेस आक्रमक होऊन पाने खाऊन छिद्र पाडते तसेच नवीन रोपे, कोबं, भाजीपालावर्गी पिके, फळे, फुले तसेच इतर सर्व प्रकारच्या पिकांचे अवशेष यावरी उपजिका करते.

प्रतिबंधात्मक उपायोजना:- शेतकऱ्यांनी ८० ते १०० मी.मी. पाऊस पडल्यानंतरच पेरणी करावी. जमिनीचे खोल नांगरट करावी, बांधाच्या कडेला चर खोदावे, शेताचे बांध स्वच्छ ठेवावेत जेणेकरून गोगलगायना लपण्यास व अंडी घालण्यापासून रोखता येते. रबरी हात मोजे घालून प्रादुर्भावीत शेतातील शंकी गोगलगायी व त्यांची लपण्यास व अंडी घालण्यापासून रोगखता येते.

रबरी हातमोजे घालून प्रादुर्भावीत शेतातील शंखी गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून नष्ट करावीत.

गुळाच्या द्रवणात एक किलो गुळ प्रति दहा लिटर पाणी गोणपाटाचे पोती भिजवून ती संध्याकाळच्या वेळेस शेतात पिकाच्या ओळीत पसरून द्यावीत. त्याखाली लपलेल्या गोगलगायी सकाळी गोळा करून उकळत्या पाण्यात किंवा साबणाच्या द्रावणात किंवा केरोसीन मिश्रित पाण्यात टाकून माराव्यात किंवा खोल खड्ड्यात पुरुन वरून चुण्याची भुकटी टाकून खड्डा मातीने झाकावा.

लहान गोगलगाईच्या नियंत्रणासाठी 20 टक्के मिठाच्या द्रावणाची फवारणी करावी, शेत किंवा बागेच्या सभोवती बांधापासून आतल्या बाजूने तंबाखू किंवा चुन्याचा 4 ते 5 इंच पट्टा टाकल्यास गोगलगायींना अटकावा होतो.

रासायनिक उपयोजना मेटाल्डिहाईड 2.5 टक्के भुकटीचा 50 ते 80 ग्राम 100 स्केअर फुट वापर गोगलगाईच्या मार्गात, पिकाच्या दोन ओळीत किंवा प्रादुर्भाकवत क्षेत्रात केल्यास गोगलगायींचे चांगले नियंत्रण करता येते.

गोगलगायीच्या नियंत्रणासाठी विषारी आमिषाचा वापर करता येतो. त्यासाठी गहू किंवा भाताचा भुसा किंवा कोंडा 50 किलो अधिक 25 ग्रॅम ईस्ट गुळाच्या द्रवणात 200 ग्राम गूळ प्रति 100 लिटर पाणी 12 ते 15 तास भिजत ठेवावा. त्यात मिथोमिल 40 एस.पी या कीटकनाशकाची 50 ग्रॅम भुकटी मिसळावी. अशा रितीने तयार केलेले आमिष संध्याकाळच्या वेळी प्रादुर्भावित शेतात पसरवून द्यावे. विषारी आमिष खाऊन मेलेल्या गोगलगायी हातामध्ये रबरी मोजे घालून गोळा कराव्यात. व 1 मीटर खोल खड्ड्यात पुरून टाकाव्यात.

मिथेमिल हे अत्यंत विषारी कीटकनाशक असल्याने पाळीव प्राणी तसेच भटके प्राणी किंवा पक्षी अमिषांनी मेलेल्या मेलेल्या खाणार नाहीत याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

शंकीगाईच्या नियंत्रणासाठी एकट्या शेतकऱ्यांने प्रयत्न करतात सामूहिकरित्या प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच कृषी विद्यापीठाच्या शिफारशी प्रमाणे उपचाराचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

# सद्गुरु सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज यांच्या अभिष्टचिंतन सोहळा थाटात संपन्न.

**प्रतिनिधी/मुखेड**

श्री शिवलिंग बादशाह मठ संस्थान बेटमोगरा तालुका मुखेड येथील मठाधिपती सद्गुरु १०८ ष.ब्र डॉ सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज यांच्या ४५ वा जन्मदिन अभिष्टचिंतन सोहळा दि.५ मे रोजी मोठ्या थाटात संपन्न झाला. सद्गुरु डॉ सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर यांचे अनेक उपक्रम समाज व राष्ट्र उपयोगी असतात त्यात कपिलधार पदयात्रा, अनेक अखंड शिवनाम सप्ताह,रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, वृक्षरोपण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,शेतकरी मेळावा, नदी वाचवा यासोबतच हिंदू मुस्लिम एकतेचे अनेक उपक्रम महाराजांच्या हस्ते पार पडतात त्याचाच एक भाग म्हणून बेटमोगरा येथील सर्व जाती धर्माचे लोक एकत्रित येऊन सद्गुरु डॉ सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर यांच्या ४५ व्या जन्मोत्सव निमित्त वृक्षरोपण तसेच अनेक सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात डॉ सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी मुखेड विधानसभेचे माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक दत्तात्रय पाटील बेटमोगरेकर, शिवाजी पाटील, चिनू पाटील, सचिन पाटील टाकळीकर,धनराज पाटील बेटमोगरेकर,नय्युम दफेदार सरपंच बेटमोगरा, भानुदास पाटील,हरिहर पाटील, सचिन पाटील बेटमोगरा, शिवराज राजेश पाटील, सुनील धोते,विठ्ठल मुधळे, उमाकांत मुधळे,नागेश पाटील, विशाल पाटील,महेश पाटील,अच्युत बरडावार आदीसह पंचक्रोशीतील हजारो भक्तगणांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी आयोजक मेनकुदळे परिवार व बेटमोगरा ग्रामस्थांनी प्रयत्न केले या कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने करण्यात आली.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वनविभाग, बचत गटाच्या माध्यमातून वृक्षारोपण वनविभाग केज व बचत गटाचा उपक्रम




वादळवार्ता/केज दि. ५ जुन रोजी जागतिक पर्यावरण दिन केज तालुक्यातील मौजे सारणी (आ)येथे साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमामध्ये शेतकरी मजुर बचत गट सारणी (आ) येथील बचत गटामधील अध्यक्षा व सदस्य उपस्थित होते . सारणी (आ) येथील रोपवाटीका वना शेजारी वृक्ष रोपवन करण्यात आली त्यामध्ये अशोका, सिताफळ, आवळा , करज, चिंच इत्यादींचे रोपटे लावण्यात आले . यामध्ये शेतकरी मजुर बचत गट सारणी (आ) सदस्य संख्या १३ , प्रतिक्षा बचत गट संदस्य संख्या ४ तसेच वनकर्मचारी याची संख्या ०२ व ग्रामस्थ ०४ असे मिळून २३ जनांचा समावेश होता .

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
शुक्रवार ७ जून २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# महाराष्ट्रात यांनी केला दिग्गजांचा मूड ऑफ; राज्यातील जायंट किलर आहेत तरी कोण?

**बीड /प्रतिनिधि**

निवडणुकीत जय-पराजय हा ठरलेला असतो. निवडणुकीच्या आखाड्यात काही मतदारसंघाने असे काही कौल दिले की, अनेकांच्या टोप्या हवेत उडाल्या. काहींचे पटके हवेत उसळले. त्यांना या निकालाने डोळे चोळायला लावले. राज्यातील राजकारणात भाजपचा वरचष्मा होता. भाजपने राज्यात दोन पक्षांना सुरुंग लावला. ते पक्ष फोडले आणि त्यानंतरचे महाभारत अवघ्या महाराष्ट्राने अनुभवले. पण राज्यातील जनतेने पण त्यांचा अनुभव मताच्या रुपाने भाजपच्या पारड्यात टाकला. दोन आकड्यावरुन भाजप एका अंकावर आली. राज्यातील या मतदारसंघातील निकाल धक्कादायक ठरले. पतीचा वारसा चालवला; प्रतिभा धानोरकर ठरल्या जायंट किलर विदर्भातील राजकारणात सुधीर मुनगंटीवार हे मोठे नाव आहे. गेल्या 35 वर्षांपासून चंद्रपुरमध्ये ते सक्रिय आहेत. विधानसभेला आमदार, कॅबिनेट मंत्री असा त्यांचा प्रवास आहे. यावेळी त्यांच्यासमोर बाळू धानोरकर यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर यांचे आव्हान होते. पतीच्या निधनामुळे त्यांना काँग्रेसने तिकीट दिले होते. गेल्या लोकसभेवेळी याच मतदारसंघातून त्यांच्या पतीने हंसराज अहिर यांना हरवले होते. त्यावेळी त्यांचे नाव गाजले होते. यावेळी प्रतिभा धानोरकर यांनी पतीचा वारसा चालवला. सुधीरभाऊंना आस्मान दाखवत त्या जायंट किलर ठरल्या. धानोरकर यांना 7,18,410 मते तर सुधीर मुनगंटीवार यांना 4,58,004 इतकी मते मिळाली. 2 लाख 58 हजाराच्या फरकाने धानोरकरांनी मुनगंटीवार यांचा पराभव केला.

जनतेचे मिळाले ‘बळ’; भाजपच्या स्टार प्रचारकाचा दारुन पराभवसंपूर्ण राज्यात लोकसभेच्या रणधुमाळीत अमरावती इतका ‘ड्रामा’ कोणत्याच मतदारसंघात दिसला नाही. घडला नाही. अवघ्या देशाचे लक्ष केंद्रित करण्यात भाजपच्या उमेदवार नवनीत राणा यांना यापूर्वीच यश मिळाले होते. 2019 मध्ये त्यांना या मतदारसंघाने भरभरुन मत देत दिल्लीत पोहचवले होते. पण राणा दाम्पत्याचे भाजप वगळता कोणाशीच सुर जळल्याचे दिसले नाही. त्यांच्याविरोधात अमरावतीत वातावरण तयार झाले होते. वंचित, बच्चू कडू यांच्यासह महायुतीतील घटक पक्ष आणि त्यांचे कार्यकर्ते त्यांच्यावर नाराज होते. उद्धव ठाकरे सरकार असताना त्यांनी केलेले आंदोलन आणि वाद यामुळे नवनीत राणा यांनी लक्ष वेधले होते. यावेळी भाजपने त्यांना तिकीट दिले असले तरी इतरांची नाराजी ते रोखू शकले नाही. अमित शाह यांनी सभा घेऊनही त्याचा फायदा झाला नाही. काँग्रेसचे बळवंत वानखेडे यांनी राणा यांचा पराभव केला. हा पराभव भाजपसाठी धक्कादायक ठरला. वानखेडे यांना 5,26,271 तर नवनीत राणा यांना 5,06,540 मते मिळाली. बच्चू कडू यांचे समर्थक दिनेश बूब यांना 85,300 मते मिळाली. नीलेश लंके यांनी कानपिचक्यांना दिले विजयातून उत्तरअहमदनगर लोकसभा मतदारसंघात मोठा उलटफेर झाला. भाजपच्या सुजय विखे यांना नीलेश लंके यांनी मोठा धक्का दिला. राष्ट्रवादीत उभी फुट पडल्यानंतर नीलेश लंके अजित पवार गटासोबत गेले. पण लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी शरद पवार गट जवळ केला. त्यावेळी त्यांना दिग्गजांनी कानपिचक्या दिल्या. पण सुजय विखे यांना आस्मान दाखवत नीलेश लंके यांनी विजय खेचून आणला. शिक्षकाने केंद्रीय मंत्र्याला पाठवले घरी राज्यातील दिडोंरी लोकसभा मतदारसंघात आधीपासूनच धुसफूस सुरु होती. कांदा प्रश्नावरुन शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु होते. भाजपच्या शेतीविषयीच्या उलटसुलट धोरणाचा विरोधकांनी बेमालुमपणे उपयोग करुन घेतला. केंद्रीय मंत्री असलेल्या भारती पवार यांना कांदा आणि पाणी टंचाईचा मोठा फटका बसला. गोंडेगावचे शिक्षक भास्कर भगरे यांनी दणक्यात विजय मिळवला.

राष्ट्रवादी शरद पवार गटाने मतदारसंघातील असंतोष ओळखून त्यांना उमेदवारी दिली आणि त्यांनी हा गड खेचून आणला.

## जायकवाडीत फक्त साडेचार टक्केच जलसाठा उपलब्ध

**पैठण/प्रतिनिधि**

पैठण तालुक्यातील अनेक गावांना पिण्याच्या पाण्याचे भीषण संकट निर्माण झाले असून यंदा उन्हाळ्याच्या शेवटच्या टप्प्यात तालुक्यात गंभीर पाणीटंचाई निर्माण झाली असून जायकवाडी धरणात केवळ साडेचार टक्के जलसाठा शिल्लक आहे .तालुक्यात टंचाईग्रस्त ८४ गावांना १०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असुन पाणी टंचाईने हैराण झालेले ग्रामस्थ आणि शेतकरी पावसाच्या आगमनाची मोठ्या आतुरतेने वाट पाहत आहेत . मागील वर्षी पैठण तालुक्यात झालेल्या अल्प पावसामुळे जायकवाडी धरणात जेमतेम पाणीसाठा शिल्लक आहे. पाण्याअभावी शेतकऱ्यांची पिकेही हाताची गेली व परिणामी दुष्काळाच्या छायेखाली असलेल्या पैठण तालुक्यातील अनेक गावांना पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. सध्या



तालुक्यातील टंचाईग्रस्त ८४ गावांना १०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असुन जायकवाडी धरणात पाणीसाठा ४.५० असा अल्प प्रमाणात राहीला असून धरणातील जिवंत पाणीसाठा संपताच मृतसाठ्यातील पाणी उपसा करावा लागणार अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

## बालविवाह थांबविलेल्या मुलीला इयत्ता दहावीला ९३% टक्के गुण जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंढे यांनी केला सत्कार.

**प्रतिनिधि/बीड**



जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंढे यांच्या अध्यक्षते खाली दि.०६/०६/२०२४ रोजी जिल्हा कृती दलाची बैठक पार पडली. या बैठकीत माहे एप्रिल २०२४ ते माहे मे २०२४ काळातील चाईल्ड हेल्पलाईन बीड, वन स्टोप सेंटर, शक्ती सदन- स्वाधारगृह या कार्यालयांच्या कामकाजाची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुधीर ढाकणे यांनी जिल्हाधिकारी यांना दिली. नंतर चाईल्ड हेल्पलाईन जिल्हा समन्वयक अश्विनी जगताप, बाल कल्याण समिती अध्यक्ष अशोक तांगडे यांनी आपापल्या कार्यालयाचे अहवाल देऊन आपल्या चालू कामकाजाची माहिती बैठकीत मांडली. या वेळी बालविवाह संदर्भात विविध उपाय योजना बाबत जिल्हाधिकारी यांनी विविध विभागाला सूचना दिल्या. यावेळी मागील वर्षी जिल्हा प्रशासना मार्फत आंबेजोगाई तालुक्यातील एका मुलीचा बालविवाह थांबविण्यात आला होता, नंतर मुलीच्या पालकांचे समुपदेशन करून मुलीला दहावीची परीक्षा देण्यास प्रवृत्त केले होते. या मुलीला इयता दहावीच्या परीक्षेत ९३% टक्के गुण मिळाले. बालविवाह थांबवून शिक्षणाच्या प्रवाहात आल्यामुळे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंढे यांनी सदर मुलीचा जिल्हा कृती दल बैठकीत सत्कार केला व तिच्या पालकांचे देखील अभिनंदन केले. तसेच बीड जिल्ह्यातील विविध बालगृहातील मुलांचा दहावीतील परीक्षेत यश मिळवल्या बद्दल जिल्हाधिकारी यांनी सत्कार केला. मागील वर्षात बालविवाह मुक्त मोहिमच्या उत्तम अंमलबजावणी केल्यामुळे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंढे यांनी शिक्षण विभाग व बाल कल्याण विभागाचे कौतुक केले. तसेच शिक्षण विभागा मार्फत बालविवाह विरोधी प्रतिज्ञा, पथनाट्य, निबंध स्पर्धा अशे विविध कार्यक्रम या वर्षी देखील राबवून बालविवाहचे दुष्परिणाम लोकांपर्यंत पोहोचवावी जेणे करून चाइल्ड हेल्पलाइन (१०९८) या क्रमांकावर बालविवाह बाबत जास्तीत जास्त माहिती देतील. यावेळी बीड जिल्हा बालविवाह मुक्त मोहीम अंतर्गत जिल्हा कृती दलाचे या वर्षीचे नियोजन देखील करण्यात आली. यावेळी विविध विभागाचे विभाग प्रमुख, युनिसेफ व इतर सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## बीड जिल्ह्याच्या शिरोपात आणखी एक तुरा बीडचे उपनिरीक्षक सूर्यकांत उर्फ राजू गुळभिळे यांचा राष्ट्रपती पदक देऊन गौरव...

**प्रतिनिधि बीड**

बीड पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत (राजु) तुकाराम गुळभिळे यांना राज्यपाल रुपेश कुमार बैस!हास्ते आज मुंबई राजभावनात राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले असून यामुळे बीड जिल्ह्याच्या शिरोपात आणखी एक तुरा लागला असून बीड जिल्हा पोलीस दलातील आपल्या कार्यतत्परता,आणि कर्तव्य दक्षतेमुळे राजू गुळभिळे हे सुपरिचित असून त्यांच्या कार्यपद्धतीचा खूप मोठा चाहता वर्ग असून सामाजिक कार्यात विशेषता निराधार मध्ये ते गेल्या अनेक वर्षापासून खूप मोठे कार्य करत असून गुन्हेगारी प्रवृत्ती आणि नशे च्या अधीन झालेल्या शेकडो तरुणांना त्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात अन्याय चे कार्या केले असून यांची दखल घेत



बीड चे पोलिस उपनिरीक्षक सुर्यकांत तुकाराम गुळभिळे यांना 2021 राष्ट्रपती पदक

देण्याची घोषणा करण्यात आली होती.याचे वितरण आज मुंबई येथील राज्यभावनात राज्यपाल रुपेश कुमार बैस यांच्या हस्ते झाले असून यावेळी सह पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई चे महासंचालक विवेक फणसाळकर, गृह विभागाचे मुख्य सचिव यांच्यासह परिवार आणि मान्यवरांची उपस्थिती होती.

## शौर्य सन्मानचिन्ह विजेते माजी सहाय्यक पोलीस आयुक्त एकनाथ खोल्लम यांच्या “वर्दी” पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न

इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशन तर्फे शौर्य सन्मानचिन्ह विजेते माजी सहाय्यक पोलिस आयुक्त एकनाथ खोल्लम यांच्या “वर्दी” पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच पत्रकार भवन येथे मोठ्या थाटात संपन्न झाला.

प्रमुख अतिथी जेष्ठ अभिनेत्री नैना आपटे यांच्या शुभहस्ते “वर्दी” पुस्तकाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ तथा साहित्यिक डॉ.लक्ष्मण शिवणेकर होते, गप्पा गोष्टीकार जंयत ओक, आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्ते डॉ.रत्नाकर अहिरे , माजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जवानसिंग गौड व जनसेवक सुरज भोईर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित. वर्दी पुस्तकाचे लेखक एकनाथ खोल्लम व सौ.निर्मला खोल्लम हे सुद्धा मंचकावर उपस्थित होते.सदरहु सोहळ्याची संकल्पना, आयोजन व नियोजन एन.डी.खान आणि सौ.सलमा खान यांनी केले होते.

यावेळी एकनाथ खोल्लम यांच्या वर तयार करण्यात आलेली टी.एम. जी क्रियेशन्स निर्मित “ वर्दीतील हळव्या मनाचा माणूस” एकनाथ माधव खोल्लम चित्रफित दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.डी.खान यांनी केले.यासमयी कु.क्रीशा गडा हिने साकार केलेला “ एक सल्यूट पोलिसांठी” अभिनयाने उपस्थित प्रभावित झाले.

## केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांचे सोशल मीडियाच्या संदर्भाने जनतेस अवाहन



**प्रतिनिधि बीड**

केज शहरातील सर्व सुजाण नागरिकांस आवाहन करण्यात येते की, केज शहरातील सोशल मीडियावर काही समाजकंटक लोक वेगवेगळ्या ग्रुप वर किंवा दुसऱ्याच्या पोस्ट खाली कमेंट बॉक्समध्ये किंवा सोशल मीडियावर कुठेही आक्षेपार्य पोस्ट करत आहेत, स्टेटस ठेवत आहेत. अशा पोस्ट समाजामध्ये अशांतता दुही पसरवत आहेत असे आपणास कुठेही निदर्शनास आल्यास त्याची माहिती , त्याचे नाव मोबाईल नंबर पोस्ट चा फोटो, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोलीस स्टेशन केज शहर ,यांचे मोबाईल क्रमांक 9821729223 नंबर वर किंवा आमचे अंमलदार यांचे 9011656511 या मोबाईल क्रमांकावर पाठविण्यात यावेत. यामुळे संबंधितावर कारवाई करून शहरातील कायदा सुव्यवस्था, शांतता अबाधित ठेवण्यास साहाय्य होईल. असे आवाहन केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com